# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०१/११/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

**पोस्टे पारशिवनी हद्दीतील देहेगाव जोशी जंगल शिवार**

**येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही**

दिनांक ३१/१०/२०२४ रोजी पोस्टे पारशिवनी येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, मौजा देहेगाव जंगल शिवारात सावली नाल्याजवळ १ इसम मोहाफुल गावठी हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन मौजा देहेगाव जंगल शिवारात सावली नाल्याजवळ रेड कारवाई करून मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे— दिलीप अंतु बोंद्रेबावने वय ५० वर्ष रा. देहेगाव जोशी ता. पारशिवनी** हा मोहाफुल गावठी हातभट्टी लावुन दारू गाळतांनी दिसुन आला. आरोपीचे ताब्यातून १) रबरी टयुब प्रत्येकी ५० लिटर प्रमाणे १०० लिटर मोहफुल दारू २) दोन पांढ—या रंगाचा मोठया प्लॅस्टिक डपक्या प्रत्येकी २० लिटर प्रमाणे ४० लिटर मोहफुल दारू ३) एका पांढ—या रंगाच्या लहान प्लास्टिक डपक्या मध्ये १० लिटर मोहफुल दारू असा एकुन १५० लिटर दारू कीमत १५०००रू.चा माल ४) दोन प्लास्टिक पन्नीमध्ये प्रत्येकी १०० लिटर प्रमाने २०० लिटर मोहफुल सडवा किमत ७००० रू. ५) दोन लोखंडी ड्रम मध्ये प्रत्येकी ३० लिटर प्रमाणे ६० लिटर मोहफुल सडवा किंमती २१०० रू. ६) दोन लोखंडी ड्रम किंमती १००० रू. ७) दोन सुती नेवार पटटी कीमत ४० रू. ८) अंदाजे ०१ मन जळाउ लाकुड की. ४०० रू. ९) दोन काळया रंगाची प्लास्टिक नळी कीमत १०० रू. १०) दोन जर्मन धातुचे मोठे घमेल कीमंत १००० रू. ११) तिन्ही प्लास्टिक डबक्या की २५० रू. असा एकुन २६,८९०/—रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे पारशिवनी येथे कलम ६५ (फ), (क), (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०१/११/२०२४ चे ०५.०० वा. दरम्यान पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, अरोली हद्दीतील इंजनी शिवारातील सुर नदीच्या पात्रातून ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरीत्या विनापरवाना रेती लोड करून वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून इंजनी ते धर्मापुरी रोडवर

नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर क्र. एम एच–४०/सी.ए.–९३४८ चे समोर एक मोटरसायकल क्र. एम.एच–४०/सी. आर– ४५४३ चालक हा रेतीने भरलेल्या ट्रॅक्टरची पायलेटींग करीत असतांना दिसुन आले. ट्रॅक्टर चा चालक **आरोपी नामे–निखील प्रकाश भोयर, वय २४ वर्ष, रा. श्रीखंडा ता. मौदा** याने सदर ट्रॅक्टरची पायलेटींग करणारा **मालक नामे–संजय भगवान भोयर, वय ४२ वर्ष, रा. श्रीखंडा ता. मौदा** याचे सांगणेवरून सुर नदीचे पात्रातुन रेती काढुन रेतीची अवैधरीत्या विनापरवाना वाहतुक करतांनी मिळुन आला. आरोपीतांना अरोली पोलीसांनी ताब्यात घेतले. तसेच ताब्यात घेतलेला ट्रॅक्टर क्र. एम एच–४०/सी.ए.–९३४८ किंमती ५,००,०००/–रू. व विनानंबरची ट्रॉली किंमती १,५०,०००/–रू. व ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये ०१ ब्रास रेती किंमती ३०००/–रू. व हिरो होण्डा स्पेल्डर क्र. एम एच ४० सि आर ४५४३ किंमती ७०,००० विवो मोबाइल किमत १५,००० व टेक्नो कंपनी मोबाईल किमत १०००० एकुन ७,४८,०००/– रू चा माल जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३०३ (२ ),४९, ३(५), ज म अधिनियम कलम ४८(७), ४८(८),खान खनिज अधि ४, २१ सार्वजनिक नुकसान सं प्रतिबं अधि कलम ३ अन्वये पो. स्टे. खापा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर